( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता )

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/३-अ/पदो/ पोउपनि ( भांडार ) ते पोनि ( भांडार)/६१/२०२३, मुंबई दिनांक :- १३ /०६/२०२४

वाचा :- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/ कार्यासन १२, दि. ०१/०८/२०१९
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीबीसी२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि. ०७/०५/२०२१
३. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग दि. १४/०७/२०२१

**-: आदेश :-**

उपरोक्त संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केलेल्या दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि. २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात येत असून, दि. २५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रुजु झालेल्या अधिका-यांना त्यांच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात येत आहे. संदर्भ क्र. ०१ मधील शासन निर्णयानुसार विभागीय पदोन्नती समितीने पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (भांडार) यांना पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (भांडार) या पदावर पदोन्नती देण्यासाठी दि. १०/०५/२०२४ रोजी पात्रता तपासून सन २०२३-२४ ची निवडसूची तयार केली आहे. पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (भांडार) यांचे फक्त १ पद मंजूर व रिक्त असल्यामुळे, सन २०२३-२४ च्या निवडसूचीवरील पात्र अधिकारी यांना पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (भांडार) या पदावर पदोन्नती देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि. १४/०७/२०२१ मधील नियमांप्रमाणे महसूल विभाग वाटप करण्याची आवश्यकता नाही.

२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन खालील नमूद पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (भांडार) यांना, त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून " **पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (भांडार)** " या पदावर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ४ मधील घटकांत करण्यास पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांनी मान्यता दिली आहे. :-

| अ.क्र. | पोलीस उपनिरीक्षक, बिनतारी संदेश (भांडार) यांचे नांव | सध्याची नेमणूक | पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (भांडार) पदावर पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | विश्वास लक्ष्मणराव डोंगरे | संचालक कार्यालय, पुणे | संचालक कार्यालय, पुणे |

३. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीचे अवलोकन व्हावे. त्यानुसार उपरोक्त अधिका-यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरुध्दच्या प्रलंबित/ प्रस्तावित विभागीय / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने

(१) शिक्षा प्रस्तावित/ चालू झाली असल्यास,
(२) विभागीय चौकशी चालू झाली असल्यास,
(३) गुन्हा दाखल / दोषारोप मा. न्यायालयात दाखल झाले असल्यास,
(४) निलंबित असल्यास इत्यादी प्रकरणात कार्यमुक्त न करता प्रकरणाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

...२...

४. सदरील आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतीम आदेशांच्या अधिन राहून व दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

५. जर संबंधित घटकामध्ये निवडणूक प्रक्रिया सुरु असल्यास किंवा त्या अनुषंगाने आचारसंहिता सुरु असल्यास घटक प्रमुखांनी त्याबाबत संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांशी संपर्क साधून, आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची काळजीपूर्वक दक्षता घ्यावी.

**६. पदोन्नत झालेले अधिकारी यांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन केले आहे.**

**रश्मि शुक्ला**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग,
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत सविनय सादर,**

अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ / महाराष्ट्र राज्य, नागपूर -२

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. कार्यालय, मुंबई

२. यांनी सदरचे आदेश पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (भांडार) यांना पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (भांडार) { PSI, W/L (Store) to PI W/L (Store) } या पदावर पदोन्नती या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov. in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

कार्यासन अधिकारी, का.क्र. २/ ९ / ११/ ११-अ/ ३६/ ४०.

( संजीव कुमार सिंघल )
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.